आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
९ सप्टेंबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- राज्य विधानसभा निवडणुकीत १६० जागा लढवून १२५ जागा जिंकण्याचं भाजपाचं लक्ष्य

- राज्यातल्या सर्व आदिवासी संघटनांना सोबत घेऊन विधानसभा निवडणूक लढवण्याचा वंचित बहुजन आघाडीचा निर्धार

- नाशिकमध्ये आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्याची राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची घोषणा

**आणि**

- **गडचिरोली** आणि **चंद्रपूरला** आज रेड अलर्ट, मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीत राज्यात भाजपानं १६० जागा लढवाव्या. त्यातल्या किमान १२५ जागा जिंकण्याचं उद्दिष्ट ठेवावं यावर भाजपाच्या कालच्या बैठकीत चर्चा झाल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल रात्री मुंबईत भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक घेतली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह इतर नेते या बैठकीला उपस्थित होते.

एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याशी जागावाटपाची अनौपचारिक चर्चा सुरू झाली आहे. पण त्यांना ७० हून अधिक जागा देण्यासंबधी निर्णय काळजीपूर्वक घ्यावा, अशी अपेक्षा  राज्यातल्या नेत्यांनी व्यक्त केली. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद आणि जिंकून येण्याची क्षमता पाहूनच त्यांना जागा द्याव्यात, अशी चर्चा यावेळी झाल्याचं या बातमीत म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकीदरम्यान झालेल्या चुका लक्षात घेऊन ही निवडणूक महायुतीमधल्या पक्षांनी एकत्रितरित्या लढवावी. त्यात भाजपाची ‘मोठ्या भावाची’ भूमिका असावी, याचा पुनरुच्चार भाजपाच्या नेत्यांनी अमित शहा यांच्यासमोर केला. एकमेकांवर सार्वजनिकरित्या टीका टाळण्याचा सल्ला अमित शहा यांनी राज्यातल्या नेत्यांना दिल्याचंही या बातमीत म्हटलं आहे. अमित शहा यांनी मुंबई दौऱ्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी जाऊन गणपतीचं दर्शन घेतलं. त्यानंतर शहा यांनी मुंबईच्या प्रसिद्ध लालबागच्या राजाचं दर्शन घेतलं. तसंच वांद्रे पश्चिम इथल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या गणरायाचं दर्शन घेऊन पूजा केली. मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार आशीष शेलार, भाजपा नेते रावसाहेब दानवे आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

वंचित बहुजन आघाडी राज्यातल्या सर्व आदिवासी संघटनांना सोबत घेऊन विधानसभा निवडणूक लढणार असल्याचं वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी जाहीर केलं आहे. आज मुंबईत वार्ताहर परिषदेत त्यांनी ही घोषणा केली. काही सर्वसाधारण जागावर आदिवासी उमेदवार निवडणूक लढवतील, असं त्यांनी सांगितलं.

आरक्षित जागाच आदिवासींनी लढाव्यात असा एक समज निर्माण झाला आहे, तो या विधानसभेच्या निमित्तानं तोडायचा मानस आम्ही केल्याचं ते म्हणाले. या दृष्टीनं महाराष्ट्रात तीन ठिकाणी जाहीर कार्यक्रम घेणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

नाशिक इथं आदिवासी विद्यापीठ सुरू केलं जाईल. त्यात ८० टक्के आदिवासी, तर २० टक्के अन्य विद्यार्थ्यांचा समावेश राहील, असं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज सांगितलं. त्यांनी आज सकाळी नाशिकच्या शासकीय विश्रामगृहात जिल्ह्यातल्या लोकप्रतिनिधींशी संवाद साधला, त्यावेळी ही माहिती दिली. या विद्यापीठात अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान आदी विषयांच्या उत्तम सुविधा असतील.

**<><><><><>**

**नागपूर** इथल्या मिहान प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडवण्यासाठी तातडीने पावलं उचलण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. मुंबईच्या सह्याद्री अतिथीगृहात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या

उपस्थितीत बैठक झाली. **मिहान** प्रकल्पांतर्गत विकसित भूखंडासाठी आकारण्यात येणारं शुल्क योग्य असावं तसंच प्रकल्पाच्या निधीसाठी सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव बैठकीसमोर सादर करावा, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. मिहान परिसरातल्या ग्रामपंचायत क्षेत्रात बांधण्यात आलेली व्यापारी संकुलं ही त्या ग्रामपंचायतीना हस्तांतरीत करावी, यामुळे संबधित ग्रामपंचायतींना उत्पन्नाचे साधन उपलब्ध होईल. तसंच पुनर्वसन काळात मिहान भागातल्या ग्रामपंचायतींना पाठवलेले पिण्याच्या पाण्याचं बिल संबधित यंत्रणांनी कमी करावे,असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

**<><><><><>**

हिंगोली जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे दोन दिवसांत पंचनामे पूर्ण करून विभागीय आयुक्तांमार्फत अहवाल पाठवण्याच्या सूचना मदत आणि पुनर्वसन आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील यांनी आज जिल्हा प्रशासनाला दिले. वसमत तालुक्यातील माळवटा, किन्होळा आणि कुरूंदा इथं अतिवृष्टीनं नुकसान झालेल्या भागाची पाहणी पाटील यांनी केली, त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

मराठा आरक्षणाच्या फेरविचार याचिकेवर येत्या बुधवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या सुनावणीत अंतिम निर्णय येण्याची शक्यता याचिकाकर्ते विनोद पाटील यांनी व्यक्त केली आहे. मराठा

समाजाला २०१९ मध्ये एसईबीसी प्रवर्गांतर्गत शिक्षण आणि नोकरीमधे दिलेलं आरक्षण सर्वोच्च न्यायालयानं रद्द केलं होतं. या निर्णयाचा फेरविचार करावा, यासाठी राज्य़ सरकारनंही अर्ज दाखल केला आहे.

**<><><><><>**

**धुळे** जिल्ह्यात माझी वसुंधरा अभियानाच्या ५व्या टप्प्यात पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा केला जात आहे. गेल्या वर्षाचा तुलनेत यंदा घरगुती आणि सार्वजनिक मंडळांमध्ये पर्यावरण पूरक गणेशाची स्थापना मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे. **हिंगोली** जिल्ह्यातल्या ३०५ गावांनी एक गाव एक गणपती ही संकल्पना राबवली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून ही संकल्पना सुरू झाली. **पालघर** जिल्ह्यातल्या उर्से गावातही एक गाव एक गणपती ही संकल्पना गेल्या ५१ वर्षांपासून सुरू आहे. याविषयी जाणून घेऊयात आमच्या आकाशवाणी वार्ताहराकडून-

**होल्ड - व्हॉईस कास्ट- नीता चौरे**

**<><><><><>**

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीने साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यांमध्ये आज आपण जपानमधल्या गणेशोत्सवाची माहिती ऐकू शकाल.

**<><><><><>**

आरोग्य वीम्यावर लादलेला १८ टक्के जीएसटी कमी करण्याची मागणीवर नोव्हेंबरमध्ये निर्णय घेतला जाईल, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली आहे. जीएसटी परिषदेच्या आज नवी दिल्लीत झालेल्या बैठकीनंतर त्या बोलत होत्या. हा मुद्दा मंत्र्यांच्या समुहाकडे पाठवलेला आहे. त्यांना ऑक्टोबरपर्यंत शिफारशी सुचवायला सांगितल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

लोकसभेत सादर केलेलं नवीन प्रस्तावित वक्फ दुरुस्ती विधेयक वक्फ बोर्डाच्या जमिनी, बोर्डाचे कार्यक्षेत्र यामध्ये हस्तक्षेप करणारं असल्याचा आरोप राज्य वक्फ बोर्डाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी अब्दुल रऊफ शेख यांनी केला आहे. ते आज नागपुरात जमाते इस्लामी हिंदनं आयोजित केलेल्या वार्ताहर परिषदेत बोलत होते.

**<><><><><>**

**रायगड जिल्ह्यात** कर्जत तालुक्यात काल झालेल्या तिहेरी हत्याकांड प्रकरणी पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतलं. ही हत्या संपत्तीच्या वादातून झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यातल्या देव्हाडी इथं चारचाकीनं दुचाकीला धडक दिल्याने आज झालेल्या अपघातात दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. दोघांचीही प्रकृती चिंताजनक असल्याचं रुग्णालय प्रशासनानं सांगितलं आहे.

**<><><><><>**

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसानं गडचिरोलीत पर्लकोटा नदीला पूर आला आहे. पुराचे पाणी भामरागड गावात शिरल्यानं तिथल्या १०१ नागरिकांना निवारागृहात हलवलं आहे. धुळेपल्ली गावाजवळ पुलावर आलेल्या पाण्यात वाहून जाणाऱ्या दोघांना पोलिसांनी वाचवलं. या पुरामुळे भामरागड-आलापल्ली, आष्टी-मुलचेरा आणि आलापल्ली-सिरोंचा हे तीन प्रमुख मार्ग बंद आहेत.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, विदर्भात काही ठिकाणी जोरदार तर तुरळक ठिकाणी अतिजोरदार पाऊस पडला. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी, तर विदर्भात आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. येत्या दोन दिवसात कोकण, आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, मराठवाड्यात अनेक ठिकाणी तर मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे.

हवामान विभागानं **गडचिरोली** आणि **चंद्रपूरला** रेड अलर्ट दिला आहे. **गोंदियात** आज आणि उद्या तर **भंडारा आणि नागपूरसाठी** उद्या ऑरेंज अलर्ट दिला आहे.

**//<><><><><>//**